# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### राज्यामधील चौथ्या महिला धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत

**(१) ५६३ (२४-०४-२०२५) श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याचे चौथे महिला धोरण माहे मार्च, २०२४ मध्ये जाहीर केले असून सदर धोरणांतर्गत नव्या व जुन्या योजनांच्या नियम व निकषात बदल करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बदलेल्या नियम व निकषांचा तपशील काय आहे,

(३) असल्यास, सदर चौथ्या महिला धोरणासंदर्भातील आराखडा तयार करण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, सदर महिला धोरणाची अंमलबजावणी केव्हापासून सुरू होणार आहे व महिलांना सदर धोरणाचा काय लाभ मिळणार आहे,

(५) असल्यास, सदर धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीकरीता शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (१८-११-२०२५) :** (१), (२) व (३) आरोग्य, पोषण, आहार व स्वास्थ्य, शिक्षण व कौशल्य विकास या बाबतीत महिलांप्रति सर्व प्रकारच्या हिंसाचारास आळा घालणे, महिलांसाठी पूरक रोजगार, उद्योजकता व कौशल्य विकास इत्यादी उपजीविकेची साधने वृद्धिंगत करणे. लिंग समानता, पायाभूत सुविधांमध्ये वाढ करणे (परिवहन, निवारा व स्वच्छतेच्या सुविधा) लिंग समान प्रशासन व राजकीय सहभाग, लिंग समानता आणि नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन, हवामान बदल अनुकूलन व आपत्ती व्यवस्थापन तसेच अन्य महत्वाची क्षेत्रे यांचा समावेश करुन महिला आणि मुलींच्या सक्षमीकरणासाठी समावेशक “अष्ट्रसुत्री महिला धोरण” तयार करण्यात आले आहे.

सदर महिला धोरण तयार करताना महत्वाची क्षेत्रे सुनिश्चित करुन त्यांच्या अंमलबजावणीचा आराखडा तयार करण्यात आला आहे.

(४) ४ थे महिला धोरणाची अंमलबजावणी शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकापासून म्हणजेच दिनांक ०७/०३/२०२४ पासून सुरु आहे.

राज्यातील महिला व मुलींना आवश्यक संधी आणि सुविधा उपलबध करुन देऊन त्यांचा सामाजिक, आर्थिक आणि अन्य क्षेत्रात विकास साधता येणार आहे.

(५) महिला धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय उच्चाधिकार समिती (HPC) तसेच मा.मंत्री, महिला व बालविकास यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय विशेष कृतीदल गठीत करण्यात आला आहे.

सदर महिला धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने संबंधित विभागाला आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## तळणी (ता. मंठा, जि.जालना) येथील कांदा बीज उत्पादक शेतकऱ्यांना कंपनीकडून लागवडीकरीता कांदा बीज न मिळाल्याबाबत

**(२) ७०८ (०९-०४-२०२५) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळणी (ता.मंठा, जि.जालना) येथील कांदा बीज उत्पादक शेतकऱ्यांना लागवडीसाठी कंपनीकडून वेळेवर कांदा बीज मिळाले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांनी बियाणांसाठी कंपनीकडे माहे नोव्हेंबर, २०२४ मध्ये हजारो रुपये भरले असूनही कंपनीने बियाणांकरीता भरलेली रक्कम परत केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शेतकऱ्यांचे नुकसान करणाऱ्या कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली तसेच शेतकऱ्यांना बियाणे व भरलेली रक्कम परत मिळण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे (०९-१२-२०२५) :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही. तळणी ता.मंठा, जि.जालना येथील कांदा बिजोत्पादक शेतकरी परस्पर खाजगी कंपनीकडे कांदा बीज उत्पादनासाठी सामंजस्य करार करुन कांदा बीजाची मागणी करतात. तळणी, ता.मंठा, जि.जालना येथील कांदा बिजोत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांनी याबाबतीत क्षेत्रिय अधिकारी कार्यालयास तक्रार दिलेली नाही. त्यामुळे कंपन्यांवर कारवाई अथवा नुकसान भरपाई बाबतचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील पर्यटनस्थळी व धार्मिक स्थळी स्त्रियांकरीता सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३) ८७१ (२४-०४-२०२५) श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.अमोल मिटकरी, श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नामांकित पर्यटनस्थळी तसेच शासकीय ठिकाणी, तिर्थक्षेत्र म्हणून नोंद असलेल्या आणि अनेक धार्मिक ठिकाणी स्त्रियांकरीता स्वच्छ प्रसाधानगृह अस्तित्वात नसल्याने स्त्रियांची मोठ्या प्रमाणत गैरसोय होत असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पर्यटन व धार्मिक ठिकाणी स्त्रियांसाठी प्रसाधानगृह बांधण्याबाबत लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केलेले किती प्रस्ताव अद्याप प्रलंबित आहेत,
(३) असल्यास, अशा प्रलंबित प्रस्तावावर तसेच पर्यटन व धार्मिक ठिकाणी स्त्रियांसाठी प्रसाधानगृह बांधकामासाठी निधी उपलब्ध करून बांधकाम लवकर पूर्ण करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (१९-११-२०२५) :** (१), (२) व (३) राज्यातील पर्यटनस्थळी पायाभूत सुविधा पर्यटन विभागाकडून उपलब्ध करून दिल्या जातात. तर ग्रामीण भागातील विविध यात्रास्थळांचा विकास करून त्या ठिकाणी भाविकांना आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात या हेतूने ग्रामविकास विभागामार्फत विहीत केलेल्या अटी व शर्तीची पूर्तता झाल्यानंतर "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यात्रास्थळ योजना (ब वर्ग)" या योजनेंतर्गत यात्रास्थळांना "ब" वर्ग दर्जा दिला जातो.

"ब" वर्ग दर्जा प्राप्त झालेल्या यात्रास्थळांच्या ठिकाणी पोहोच रस्ते, पोहोच रस्त्यावर पथदिवे, मंदीर परिसरात संरक्षण भिंत, पिण्याच्या पाण्यासाठी टाकी बांधणे, त्या ठिकाणी असलेल्या नदी/ओढयावर संरक्षण भिंत बांधणे, स्त्री/पुरुष शौचालय, स्नानगृह बांधणे, भक्त निवास, वाहनतळ यासारख्या पायाभूत सुविधांसाठी मागणीप्रमाणे निधी उपलब्ध करून दिला जातो.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात विशेषत: रायगड जिल्हामध्ये सुरक्षा रक्षक मंडळातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(४) १०२७ (२४-०४-२०२५) श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियम व कल्याण) अधिनियम, १९८१ च्या कलम ६(१) अन्वये राज्यामध्ये विविध सुरक्षा रक्षक मंडळे अधिसूचित करण्यात आली असून खाजगी सुरक्षारक्षक मंडळाकरीता मंजूर असलेल्या पदांचे पुर्नविलोकन करणे, विविध संवर्गात व त्याच्या वेतनश्रेणीत समानता आणणे, आवश्यकतेप्रमाणे अतिरिक्त पदे/संवर्ग निर्माण करणे व अनावश्यक पदे रद्द करणे त्याचबरोबर खाजगी सुरक्षा रक्षक मंडळाच्या सक्षमीकरणासाठी सर्व मंडळाच्या एकत्रित आकृतिबंधास दिनांक २८ नोव्हेंबर, २०२३ रोजी वा त्यादरम्यान मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील १६ खाजगी सुरक्षा रक्षक मंडळाकरीता विविध संवर्गात एकूण ३६० पदांच्या आकृतिबंधास शासनाने मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ येथे १३ पदे मंजूर असताना सद्य:स्थितीत केवळ अतिरीक्त कार्यभार २ पदे भरण्यात आली असून उर्वरीत ११ पदे गेल्या वर्षभरापासून रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर (०९-१२-२०२५) :** (१) व (२) अंशतः खरे आहे.

शासनाच्या दिनांक २८/११/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील खाजगी सुरक्षा रक्षक मंडळाच्या विविध संवर्गातील एकूण ३०६ पदांच्या आकृतीबंधास मान्यता देण्यात आली आहे.
(३) अंशतः खरे आहे.

रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळामध्ये अध्यक्ष व सचिव यांसह एकूण १३ पदे मंजूर असून सदर पदांपैकी अध्यक्ष व सचिव या पदांचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे. तसेच दोन निरीक्षकांच्या रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार दुकाने निरीक्षक या संवर्गातील कर्मचाऱ्यांना दिलेला आहे. तसेच उर्वरित सर्व पदे रिक्त आहेत.
(४) सुरक्षा रक्षक मंडळातील रिक्त पदे भरण्याबाबत कामगार आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली असून सदर समितीमार्फत पुढील कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## देशातील कृषी विद्यापीठांच्या एनआयआरएफ मानांकन यादीमध्ये राज्यातील एकाही कृषी विद्यापीठाचा समावेश नसल्याबाबत

**(५) १७१६ (१५-०४-२०२५) श्री.पंकज भुजबळ, श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या राष्ट्रीय मानांकन संरचना (NIRF) संस्थेमार्फत देशातील कृषी विद्यापीठांची सन २०२४ ची मानांकन यादी जाहीर करण्यात आली असून या यादीत राज्यातील एकाही कृषी विद्यापीठाचा समावेश नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील कृषी शिक्षण व संशोधनाची प्रमुख जबाबदारी पार पाडणाऱ्या डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ तसेच महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ या विद्यापीठांना केंद्र शासनाच्या NIRF मानांकनात स्थान न मिळण्याची कारणे काय आहेत,
(३) तसेच, उक्त विद्यापीठांचा शैक्षणिक दर्जा, संशोधन क्षमता आणि विद्यार्थ्यांना दिली जाणारी सुविधा सुधारण्यासाठी शासनाने आवश्यक मनुष्यबळ भरती, निधी उपलब्धता, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या नियुक्त्या याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे (१०-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) राष्ट्रीय संस्थात्मक रॅंकिंग फ्रेमवर्क (NIRF) या संस्थेने सन २०२४ मध्ये प्रकाशित केलेल्या मानांकन यादीत राज्यातील कोणत्याही कृषी विद्यापीठाचा समावेश नसला तरी, राज्यातील कृषी विद्यापीठांकडून कृषी शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता राखण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत. याशिवाय संशोधन व विस्तार शिक्षणामध्ये देखील सातत्य राखण्याच्या दृष्टीने विद्यापीठांकडून उपाययोजना करण्यात येत आहेत. विद्यापीठांची जनमानसातील प्रतिमा उंचावण्याकरीता विद्यापीठांच्या उपक्रमांची माहिती प्रसार माध्यमांवर, तसेच सामाजिक माध्यमांवर प्रस्तृत करण्यात येते.

विद्यापीठांकडून वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत असली तरी, विद्यापीठांची अलीकडच्या कालावधीतील कामगिरी तितकीशी समाधानकारक नसल्याने मानांकन यादीत विद्यापीठांचे मानांकन घसरल्याचे निर्दशनास येते. राज्य शासनाने सदर बाबीची गंभीर दखल घेतली असून, राज्यातील सर्व कृषी विद्यापीठांचा शैक्षणिक, संशोधनात्मक आणि गुणात्मक दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने करावयाच्या उपाययोजनांबाबत संबंधित कृषी विद्यापीठांशी समन्वय साधून त्याबाबतचा अहवाल आपल्या शिफारशींसह शासनास तात्काळ सादर करण्याच्या सूचना महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद यांना देण्यात आल्या आहेत.

याखेरीज, कृषी विद्यापीठांमध्ये रिक्त असलेली अध्यापकीय पदे व अनुषंगिक पदे भरण्याकरीता या सर्वच विद्यापीठांमधील पदांचा आकृतिबंध अंतिम करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

## आदिवासींच्या सर्वांगिण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या पंतप्रधान जनजातीय उन्नत ग्राम अभियानाच्या अंमलबजावणीबाबत

**(६) १८९८ (१४-०४-२०२५) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुर्गम आणि अतिदुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र शासनाने पंतप्रधान जनजातीय उन्नत ग्राम अभियानाला मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अभियानांतर्गत राज्यातील किती गावांचा समावेश करण्यात आला आहे, तसेच अभियानासाठी सन २०२४-२०२५ मध्ये केंद्र व राज्य शासनाकडून किती निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे, त्याद्वारे या गावांमध्ये कोणकोणती विकासकामे करण्यात आली असून त्यांची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, या अभियानांतर्गत करण्यात येणाऱ्या विकासकामांबाबत पुढील कालावधीसाठी कोणती धोरणे, रोडमॅप, उद्दिष्टे आणि आराखडा निश्चित करण्यात आला आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करून अभियानांतर्गत करण्यात येणाऱ्या विकासकामांसाठी पुढील कालावधीसाठी कोणती धोरणे, रोडमॅप, उद्दिष्टे आणि आराखडा निश्चित करण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, या विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके (०९-१२-२०२५) :** (१) होय.

(२) सदर योजनेत महाराष्ट्रातील ३२ जिल्हयांतील २१४ तालुके व ४९७५ गावांचा समावेश करण्यात आला आहे.

जनजातीय कार्य मंत्रालय, नवी दिल्ली येथे प्रकल्प मूल्यमापन समितीच्या Project Appraisal Committee (PAC) दिनांक २४/१२/२०२४ रोजी पार पडलेल्या बैठकीत धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियान (DA-JGUA) या योजनेतंर्गत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र राज्यातील रुपये ५७८७८.०८ लक्ष इतक्या रक्कमेच्या १६७ कामांना मंजुरी देण्यात आली आहे.

(३) सदर योजनेंतर्गत महाराष्ट्रातील आदिवासींना वैयक्तिक लाभ तसेच गांव पातळीवर सामुहीक लाभ १०० % संपृक्तता करण्याचे उदिदष्ट राहणार आहे.

(४) पुढील ५ वर्षे गांव पातळीवर सामुहीक लाभ १०० % संपृक्तता करण्याच्या उददेशाने संबंधित यंत्रणांकडून विविध ग्रामविकास कामांचे प्रस्ताव व कामांचे आराखडे मागविण्यात येत असून सदर कामांना शासनाकडून प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर निधी वितरीत केला जाणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील केंद्रप्रमुख, उच्च श्रेणी मुख्याध्यापक, विषय शिक्षकांची तसेच उर्दू शाळांसाठी आवश्यक असणारी रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याबाबत

**(७) २३५९ (०९-०७-२०२५) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये केंद्र प्रमुख, उच्च श्रेणी मुख्याध्यापक, विषय शिक्षकांची व शिक्षण विस्तार अधिकारी ही पदे रिक्त असल्याने शाळांच्या पर्यवेक्षण आणि नियंत्रणाकडे दुर्लक्ष होऊन शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील उर्दू शाळांची जिल्ह्यातील संख्या लक्षात घेऊन केंद्र प्रमुखांची पदे निश्चित करणे आवश्यक असताना काही जिल्ह्यांमध्ये उर्दू शाळांच्या मूल्यमापन व गुणवत्ता तपासणीसाठी आवश्यक असलेली पदे निश्चित करण्यात आली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्रप्रमुख, उच्चश्रेणी मुख्याध्यापक, विषय शिक्षकांची रिक्त पदे तात्काळ पदोन्नतीने भरण्याबाबत तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळांच्या गुणवत्तेकडे लक्ष देण्याचे प्रमुख कार्य करणाऱ्या केंद्रप्रमुखांची उर्दू शाळांसाठी आवश्यक असणारी पदे निश्चित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (०१-१२-२०२५) :** (१) राज्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये केंद्रप्रमुख, उच्च श्रेणी मुख्याध्यापक, विषय शिक्षकांची व विस्तार अधिकारी (शिक्षण) या संवर्गाची काही पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार नियमित केंद्रप्रमुख/सेवाज्येष्ठ मुख्याध्यापक/पदवीधर शिक्षकांकडे सोपविण्यात येत आहे. तसेच शाळांच्या पर्यवेक्षण व नियंत्रणाकडे लक्ष देण्यात येत आहे.

(२) व (३) राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये उर्दू शाळांच्या मुल्यमापन व गुणवत्ता तपासणीसाठी आवश्यक असलेली केंद्रप्रमुखांची पदे निश्चित करण्यात आलेली नाहीत. या जिल्ह्यांमध्ये उर्दू शाळांची जिल्ह्यातील संख्या लक्षात घेऊन केंद्रप्रमुखांची आवश्यक असणारी पदे निश्चित करण्याबाबतची कार्यवाही प्रस्तावित आहे.

तसेच केंद्रप्रमुख, उच्चश्रेणी मुख्याध्यापक, विषय शिक्षकांची रिक्त पदे सेवा प्रवेश नियमांतील तरतुदीनुसार जिल्हा परिषद स्तरावरुन सरळसेवेने/पदोन्नतीने वेळोवेळी भरण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई विद्यापीठासह राज्यातील अन्य सरकारी विद्यापीठानांही वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) भरण्याची नोटीस बजावण्यात आल्याबाबत

**(८) २७९५ (१८-०७-२०२५) अॅड.अनिल परब :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुंबई विद्यापीठासह अन्य सरकारी विद्यापिठांना सन २०१७ पासूनचा वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) भरण्याची नोटीस बजावण्यात आल्याचे माहे एप्रिल,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्रीय जीएसटी विभागाने मुंबई विद्यापीठाकडे सन २०१७ पासूनचा रुपये १६ कोटी ९० लाखांचा जीएसटी आणि त्यावरील दंड भरण्याबाबत नोटीस बजावल्यामुळे यांचा भुर्दंड विद्यार्थ्यावर पडणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यापीठांनी शासनाकडे त्यांना जीएसटीतून वगळण्याची मागणी केली असून शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करुन जीएसटीतून वगळण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (२०-११-२०२५) :** (१) हे खरे आहे. शासनाच्या विभागाकडून प्राप्त झालेली जीएसटी नोटीस दिनांक २७/०१/२०२५ रोजी मुंबई विद्यापीठास प्राप्त झाली आहे.

(२) हे खरे आहे. केंद्रीय जीएसटी विभागाने मुंबई विद्यापीठाकडे सन २०१७ पासूनचा १६ कोटी ९० लाख रुपायांचा जीएसटी आणि त्यावरील दंड भरण्याबाबत नोटीस बजावली आहे. परंतु, यांचा भुर्दंड विद्यार्थ्यांवर पडणार नाही. सदर कालावधीतील विविध प्रकारच्या शुल्कांची रक्कम कराव्यतिरिक्त विद्यापीठाकडे जमा झालेली आहे.

(३) राज्य कर विभागाकडून प्राप्त अहवालानुसार संलग्नता शुल्कावरील वस्तू आणि सेवा कराबाबत सुट नसल्याचे सर्व विद्यापीठांना दिनांक १४/०६/२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तसेच मुंबई विद्यापीठाने माननीय उच्च न्यायलयात रिट याचिका दाखल केलेली आहे. त्यामुळे सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे उपकेंद्र वाशिम येथे सुरु करण्याबाबत

**(९) २८५१ (१८-०७-२०२५) श्री.किरण सरनाईक : तारांकित प्रश्न क्रमांक ८४२ ला दिनांक ६ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे उपकेंद्र वाशिम जिल्ह्याला मिळावे, याकरीता विविध सामाजिक संस्था व संघटनांचे पदाधिकारी, शिक्षणतज्ज्ञ, विद्यार्थी, स्थानिक लोकप्रतिनिधी व जनतेकडून अनेक दिवसांपासून मागणी होत असल्याचे माहे मे,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठांतर्गत अकोला, अमरावती, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ या जिल्ह्यांतील जवळपास ४४० वरिष्ठ महाविद्यालये येत आहे तसेच सर्वाधिक वरिष्ठ महाविद्यालये ही वाशिम, बुलढाणा आणि अकोला जिल्ह्यात असल्याने या जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना जवळपास १०० कि.मी.चा प्रवास करुन विद्यापीठात जावे लागते असून वाशिम हे अकोला, बुलढाणा व अमरावती जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना सोयीस्कर व मध्यवर्ती ठिकाण असल्याने, विद्यार्थ्यांना १०० कि.मी. वा प्रवास करताना होणारा त्रास कमी होईल व विद्यापीठाचे शैक्षणिक काम सुरळीत चालेल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यापीठांकडून शासन निधीतून उपपरिसर सुरु करण्याचे प्रस्ताव प्राप्त झाले असून तद्नुषंगाने उपपरिसर स्थापन करण्याबाबत समितीची स्थापना करण्यात आली असून समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शिक्षणतज्ज्ञ, सामाजिक संघटना व त्यांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी तसेच विद्यार्थी, जनतेकडून होत असलेली मागणी लक्षात घेता मागणीच्या अनुषंगाने शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (२०-११-२०२५) :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) राज्य सार्वजनिक विद्यापीठांमध्ये उपकेंद्र स्थापन करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळातील रिक्त पदांचा अनुशेष पूर्ण करणेबाबत

**(१०) ३३५९ (१८-०७-२०२५) श्री.कृपाल तुमाने, श्री.हेमंत पाटील, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे : दिनांक ८ जुलै, २०२४ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १ मधील प्रश्न क्रमांक २१२८९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत अनेक महत्वपूर्ण सिंचन प्रकल्पाचे कार्य सुरु असल्याने शेतकरी व सामान्य नागरिक प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या त्यावर अवलंबून असून या महामंडळातील सर्व संवर्गातील सुमारे ५८१७ पदे रिक्त असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रिक्त पदांमुळे कार्यरत कर्मचारी यांचेवरील कामाचा ताण वाढला असून अनेक महत्वाच्या प्रकल्पांचे काम संथ गतीने सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रिक्त पदांचा अनुशेष भरून काढण्यासाठी शासन स्तरावर कोणती कार्यवाही सुरु आहे तसेच याबाबत काही दीर्घकालीन धोरण निश्चित करणेबाबत शासन विचाराधीन आहे काय, असल्यास, त्याचा तपशील काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (२१-११-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

या महामंडळांतर्गत ४ प्रादेशिक कार्यालयांतर्गत १४ विभागीय मंडळ कार्यालय व मंडळ / विभागीय/ उपविभागीय कार्यालयांतर्गत गट अ ते गट ड संवर्गातील मंजूर, भरलेली व रिक्त पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| कार्यालय | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| मुख्य अभियंता, जसंवि, नागपूर | ४४७५ | १६७२ | २८०३ |
| मुख्य अभियंता, गो.प्र. जसंवि, नागपूर | १८७२ | ९७६ | ८९६ |
| मुख्य अभियंता, जसंवि, अमरावती | २५९३ | १५११ | १०८२ |
| मुख्य अभियंता, वि.प्र. जसंवि, अमरावती | २०८९ | १०८२ | १००७ |
| एकूण वि.पा.वि.म, नागपूर | ११०२९ | ५२४१ | ५७८८ |

(२) हे खरे नाही.

उपरोक्त नुसार रिक्त पदे दिसुन येत असली तरी या महामंडळांतर्गत प्रकल्प सिंचन योजना पूर्ण करणेसाठी उपलब्ध मनुष्यबळाकडुन प्रकल्प कामे विहीत मुदतीत पूर्ण करुन घेण्यात येत आहेत.
(३) सद्य:स्थितीत जलसंपदा विभागाचा सुधारित आकृतिबंध निश्चित करण्याबाबत कार्यवाही सुरु असून विभागाचा सुधारित आकृतिबंध निश्चित झाल्यावर रिक्त पदांची पदभरती करण्याबाबत उचित कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील नर्मदा जल करार वाढविणेबाबत

**(११) ४०७९ (१८-०७-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील नर्मदा जल कराराची मुदत माहे जुलै, २०२४ मध्ये संपली असून सदर कराराची मुदत वाढविणेबाबत शासन विचाराधीन आहे काय,

(२) असल्यास, नर्मदा नदीतून राज्यास मिळणाऱ्या १०.८९ TMC वापराबाबत उपाययोजना करण्यासाठी व नर्मदा जल करार मुदतवाढ घेवून पुन्हा करार करणेसंदर्भात शासनाकडून कोणती कार्यवाही / उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (२१-११-२०२५) :** (१) हे खरे नाही.

सरदार सरोवर प्रकल्पांतर्गत महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान व मध्य प्रदेश या चार राज्यात नर्मदा नदीचे पाणी वाटपाच्या संदर्भात राज्यातील करारनामा नसून लवादाने दिलेला निवाडा असून दिनांक १२ डिसेंबर, १९७९ रोजी प्रसिध्द झाला आहे. सदर निवाड्याची मुदत संपल्याचा प्रश्न उद्भवत नाही. तथापि, निवाड्यातील निर्देशानुसार प्रसिद्धीच्या ४५ वर्षानंतर सदर निवाड्याचा आढावा (Review) घेण्याची तरतुद असून अद्यापपावेतो कोणत्याही पक्षकार राज्याने याबाबत प्रस्तावित केलेले नाही.
(२) महाराष्ट्र राज्य हिस्स्याचे १०.८९ टी.एम.सी. पाण्यापैकी ५ टी.एम.सी. पाणी नर्मदा खोऱ्यात गुजरात राज्यासाठी सोडुन देऊन तेवढेच पाणी गुजरात राज्याच्या उकाई धरणाच्या पश्च जलाशयातुन ५ TMC पाणी उपसा करुन महाराष्ट्र राज्यातील क्षेत्रासाठी सिंचन करण्यासाठी महाराष्ट्र व गुजरात राज्यादरम्यान दिनांक ०७/०१/२०१५ रोजी सामंजस्य करार करण्यात आलेला आहे. त्यानुसार सदर सर्वेक्षणाचे कामास दिनांक ०६/१२/२०२४ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले असून सर्वेक्षणाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. या योजनेतील नंदुरबार, नवापुर, अक्कलकुवा, तळोदा या तालुक्यातील सुमारे ३०,००० हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे.

नर्मदा-तापी वळण योजना, ता.धडगाव, जि.नंदुरबार या योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल महामंडळाचे पत्र दिनांक ३१/०७/२०२५ रोजी राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांना सादर करण्यात आला असून तपासणीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. या योजनेतुन ५.५९ TMC पाणी तापी खोऱ्यात वळविणेत येणार असून तळोदा व शहादा तालुक्यातील गावांना सुमारे २३,५२६ हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे.

०.२७ टी.एम.सी. स्थानिक उपयोगासाठी ०.०३० टी.एम.सी. उमराणी लघु पाटबंधारे योजनेसाठी प्रस्तावित आहे. न्यायाधिकरणाच्या निर्णयाचे अंमलबजावणीसाठी नर्मदा नियंत्रण प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. सदर प्राधिकरण कार्यान्वित आहे. प्राधिकरणामार्फ़त पाणी वापराबाबत दरवर्षी नियोजन करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सुतारवाडी (ता.रोहा, जि.रायगड) येथे सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे बांधण्यात येणाऱ्या हेलिपॅडची निविदा रदद केल्याबाबत

**(१२) ४२५६ (१८-०७-२०२५) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुतारवाडी (ता.रोहा, जि.रायगड) येथे सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे १ कोटी ३९ लाख रुपये खर्चून बांधण्यात येणाऱ्या हेलीपॅडची निविदा काढूनही केवळ तांत्रिक कारण पुढे करुन निविदा रद्द करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर हेलिपॅड बांधकामासंदर्भात ई-निविदा शुध्दीपत्रक प्रसिध्द केल्यानंतर रद्द करण्यात आलेल्या निविदेकरीता मंजूर झालेला निधी कशाप्रकारे वर्ग करण्यात आला आहे, त्याचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, सदर निधी वर्ग करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१८-११-२०२५) :** (१) विभागीय कार्यालयाकडून निविदा प्रसिध्द केलेल्या कालावधीमध्ये हेलिपॅडच्या कामाकरीता हेलिपॅडसाठी उपयुक्त अशी शासकीय जागा उपलब्ध न झाल्यामुळे विषयांकित कामाची ई-निविदा रद्द करण्यात आली.
(२) सदर कामास विभागीय कार्यालयास निधी प्राप्त झालेला नाही, तसेच सदर कामावर निधी खर्च करण्यात आलेला नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील अ, ब, क आणि ड प्रवर्गातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करण्याबाबत

**(१३) ४३७८ (१८-०७-२०२५) श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांना केंद्राप्रमाणे सेवानिवृत्ती वय ६० वर्षे करावे, अशी मागणी होत असल्याची बाब माहे मे २०२५ मध्ये वा त्यादरम्याननिदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्रीय कर्मचाऱ्यांप्रमाणे शासनाच्या अ, ब वक प्रवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना किमान ६० वर्ष शासकीय सेवेत काम करण्यासाठी संधी देण्याबाबत राज्यातील शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी माहिती व निर्णय घेऊन सदर मागणीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (२०-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) शासकीय कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करण्याबाबत शासन स्तरावर विचारविनिमय चालू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अधिसूचना काढून संवर्धित केलेल्या चंदेरी पापलेटची प्रजाती धोक्यात आल्याबाबत

**(१४) ४६३७ (२३-०९-२०२५) श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने अधिसूचना काढून संवर्धित केलेल्या चंदेरी प्रॉमफ्रेटची प्रजाती हवामान बदल, बेसुमार मासेमारी तसेच लहान आकारांच्या पिल्लांची मासेमारी अशा विविध कारणांमुळे धोक्यात आली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंदेरी प्रॉमफ्रेट मासा नामशेष होण्याच्या मार्गावर असताना मच्छीमार संघटनांनी त्यांच्या संवर्धनासाठी पुढाकार घेत राज्यमासा घोषित करण्याची मागणी केली असून त्यानुसार शासनाच्या मत्स्यव्यवसाय विभागाने या माशाला विशेष दर्जा देऊन राज्य माशाचा दर्जा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चंदेरी प्रॉमफ्रेट माशांचे संवर्धन करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नितेश राणे (१०-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२) महाराष्ट्राच्या सागरी जलधीक्षेत्रातील, सिल्वर पॉमफ्रेट या माशास राज्यमासा म्हणून घोषित करण्यात आले आहे.

(३) कृषी व पदुम विभागाचे दिनांक ०२/११/२०२३ च्या शासन अधिसुचनेनुसार मासेमारीसाठी माशांच्या जातीनुसार किमान कायदेशीर आकारमान (MLS) निश्चित करण्यात आले आहे. यामध्ये सिल्वर पॉमफ्रेट या जातीसाठी १३५ MM इतकी किमान कायदेशीर आकारमान (MLS) निश्चित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) पात्र उमेदवारास कायमस्वरुपी टीईटी पात्र समजण्याबाबत

**(१५) १०३४१ (०६-०१-२०२२) श्री.विक्रम काळे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेवेत कार्यरत असलेल्या व शिक्षणाधिकाऱ्यांनी मान्यता दिलेल्या परंतु, माहे ऑक्टोबर, २०२१ अखेर टीईटी उत्तीर्ण न झालेल्या राज्यातील शिक्षकांची संख्या किती आहे व सदरहू शिक्षकांचे वेतन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन एकदा टीईटी परीक्षा पात्र झालेल्या उमेदवारास कायमस्वरुपी टीईटी पात्र समजण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२२-०९-२०२५) :** (१) बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ नुसार कार्यरत शिक्षकांनी शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता दिनांक ३१/०३/२०१९ पर्यंत संपादित करणे बंधनकारक आहे. त्यानुसार दिनांक २४/०८/२०१८ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील शिक्षकांनी राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेने निश्चित केलेली किमान अर्हता दिनांक ३०/०३/२०१९ अखेर धारण करणे अनिवार्य केले आहे. त्यानुसार कार्यरत शिक्षकांनी शिक्षक पात्रता परीक्षा दिनांक ३०/०३/२०१९ पर्यंत प्राप्त करणे बंधनकारक आहे. अन्यथा शिक्षकांच्या सेवा संपुष्टात करणत याव्यात, अशी तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे मार्च २०१९ नंतर शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण उमेदवारांच्या बाबतीत वेगळ्याने कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही.

(२) एकदा शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर कायमस्वरुपी शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण समजण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय क्रिडा संकुलात सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१६) २१०६७ (०५-०१-२०२४) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर जिल्यातील विभागीय क्रिडा संकुलात दररोज सरावासाठी ९०० ते १००० इतके खेळाडू येत असून त्यांचेकडून प्रवेशासाठी जवळपास रुपये ४ लक्ष इतके तसेच इनडोअर खेळातील बॅडमिंटनच्या एका कोर्टमागे महिना रुपये ५० हजार इतके शुल्क आकारले जात असल्याचे दिनांक २८ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, छत्रपती संभाजीनगर (ता.जि.छत्रपती संभाजीनगर) येथील विभागीय क्रिडा संकुलाच्या दुरुस्तीसाठी जाहीर करण्यात आलेला रुपये २५ कोटींचा निधी मंजूर करुनही कामे सुरु न झाल्याने तेथे येणाऱ्या खेळाडूंची गैरसोय होत असून क्रिडा संकुलात येणाऱ्या खेळाडूंना त्यांच्या खेळानुसार प्रवेश शुल्क आकारण्यात येवूनही खेळाडूंना सोयी-सुविधा उपलब्ध होत नसल्याच्या तक्रारी व्यवस्थापनाकडे करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विभागीय क्रिडा संकुलात ॲथलेंटीक, फुटबॉल, हॉकी, बास्केटबॉल, स्केटींग तसेच इनडोअरमध्ये बॅडमिंटन, तलवारबाजी या खेळांसाठीची परवानगी असताना तेथे अनधिकृतपणे क्रिकेट सरावही करण्यात येत आहे तसेच या संकुलामध्ये प्रवेश करणाऱ्या व्यक्तींचे ओळखपत्र तपासणी होत नसल्याने बाहेरील व्यक्तींचा व तेथे होणाऱ्या अनधिकृत पार्किंगचा सराव करणाऱ्या खेळाडूंना नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर क्रिडा संकुलात बऱ्याच असुविधा असल्याने खेळाडूंनी क्रिडा प्रशासनाकडे याबाबत वारंवार मागणी करुनही कोणत्याही सुधारणा होत नसून विभागीय क्रिडा संकुलासाठी मुंजुर करण्यात आलेल्या निधीच्या माध्यमातून खेळाडूंना आवश्यक अशा सोई-सुविधा उपलबध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, सदरहू प्रकरणी दोषी क्रिडा संकुल अधिकाऱ्यांविरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (०६-१२-२०२५) :** (१) विभागीय क्रीडा संकुल, छत्रपती संभाजीनगर मध्ये क्रीडा सुविधांचा वापरासाठी शुल्क, विभागीय क्रीडा संकुल समितीने ठरवलेले आहेत. बॅडमिंटन कोर्टचे शुल्क प्रति व्यक्ती प्रति तास रुपये १,३००/-असे शुल्क आकरणत येत आहे.
(२) छत्रपती संभाजीनगर विभागीय क्रीडा संकुलाच्या विकासकामांसाठी रुपये २१,३५,७९,६००/- निधी मंजूर करण्यात आले आहे. विभागीय क्रीडा संकुलात येणाऱ्या खेळाडुंनी पिण्याचे पाणी व स्वच्छता या बाबीविषयी केलेल्या तक्रारीची दखल घेऊन या सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.
(३) विभागीय क्रीडा संकुलामध्ये इतर खेळांसोबत क्रिकेट या खेळाचा सराव संकुल समितीने निश्चित केलेल्या दरानुसार सुविधा वापर करण्याची शुल्क आकरण्यात येते. या क्रीडा संकुलामध्ये प्रवेशावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रवेशद्वारावर सुरक्षा रक्षकांची नियुक्ती केलेली आहे व सीसीटीव्ही (CCTV) च्या माध्यमातूनदेखील लक्ष ठेवण्यात येत आहे.
(४) मंजूर निधीतून या क्रीडा संकुलामध्ये ४०० मी. धावनपथ- ८ लेनचा धावनपथ,१०,००० आसनक्षमता असलेली कव्हर्ड प्रेक्षक गॅलरी, ४०० मी. सिंथेटिक ट्रॅक निर्मिती, फुटबॉल मैदान,संरक्षक भिंत आणि विद्युतीकरण/पाण्याची व्यवस्था,इनडोअर (बहुउद्देशीय) हॉलमधील सुविधा, बॅडमिंटन:१० कोर्ट, दोन स्क्वॅश कोर्ट,जिम्नॅस्टिक, तलवारबाजी,बॉक्सिंग,रायफल शूटिंग, वेटलिफ्टिंग, तायक्वांदो / वुशू (मॅटसह हॉल उपलब्ध), टेबल टेनिस, मुलांचे वसतिगृह, मुलींचे वसतिगृह, डॉर्मेट्री, इत्यादी सुविधा उभारण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नवी मुंबई येथे नवीन सरपंच भवन उभारुन सरपंचांच्या मानधनात वाढ करणेबाबत

**(१७) २३७३३ (२०-०७-२०२४) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यभरातून विविध प्रशासकीय कामानिमित्त मंत्रालय, मुंबई येथे येणाऱ्या सरपंच, उपसरपंच यांचे निवासाकरीता नवी मुंबई येथे नविन सरपंच भवन बांधण्याबाबतचे आश्वासन मा.ग्रामविकास मंत्री महोदयांनी माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवी मुंबई येथे नविन सरपंच भवन बांधण्याबाबत मा.मंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनाच्या पूर्ततेबाबत शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याने तसेच खारघर (नवी मुंबई) येथे यापूर्वी सरपंच, उपसरपंच यांचेकरीता बांधण्यात आलेल्या ग्रामविकास भवनामध्ये शासनाच्या विविध विभागांची कार्यालये सुरू असल्याने राज्याभरातून प्रशासकीय कामास्तव मंत्रालय, मुंबई येथे येणाऱ्या सरपंच, उपसरपंच यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवी मुंबई येथील सरपंच भवनाचे बांधकामास सुरु करुन सरपंच भवनचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत खारघर येथील ग्रामविकास भवन मधील शासकीय कार्यालये अन्यत्र स्थलांतरीत करून सदरहू जागा सरपंच व उपसरपंच यांच्या वापराकरीता तातडीने उपलबध करून देण्याबाबत तसेच सरपंच व उपसरपंच यांच्या मानधनात वाढ करून ते किमान १० हजार रूपये करण्याची मागणी सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्रच्या पदाधिकाऱ्यांनी मा.ग्रामविकास मंत्री महोदयांकडे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये केल्यानंतर त्यास तत्वत: मान्यता देवून खारघर येथील ग्रामविकास भवनाच्या दुरूस्तीकरीता रूपये १ कोटी रूपयांचा निधी उपलब्ध करून देण्याचे आदेश मंत्री महोदयांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू मागण्यांच्या अनुषंगाने राज्यातील सरपंच व उपसरपंच यांच्या मानधनात वाढ करणे, नवी मुंबई येथे सर्व सोईयुक्त सरपंच भवन उभारण्यासाठी आवश्यक निधी, जागा उपलब्ध करून देण्यासह सदरहू भवनाचे काम सुर करुन बांधकाम पूर्ण होईपर्यंत खारघर येथील ग्रामविकास भवनाची योग्य ती दुरूस्ती करून सदरहू भवन सरपंच व उपसरपंच यांच्या वापरास्तव उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (२०-११-२०२५) :** (१), (२), (३) व (४) सरपंच संघटनांनी वेळोवेळी दिलेल्या निवेदनामध्ये सरपंच भवनाबाबत मागणी केलेली आहे. सरपंच भवन बांधकाम पूर्ण होईपर्यंत नवी मुंबई येथील ग्रामविकास भवन सरपंच / उपसरपंच व इतर पदाधिकारी यांना वापरण्यायोग्य वापरण्याबाबत केलेल्या विनंतीनुसार सद्य:स्थितीत, ग्रामविकास भवन करण्याकरीता वित्त आयोगाच्या निधीवरील व्याज रक्कमेतून ग्रामविकास भवनाच्या दुरुस्तीकरीता रुपये ०१ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. यामध्ये इमारतीसाठी विद्युत उपकरणे, सोलर साहित्य, फायर अलार्म सिस्टिम, फर्निचर तसेच, इमारत इत्यादीची देखभाल दुरुस्ती करण्यात येणार आहे.

तसेच, शासनाच्या दिनांक २४ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये, सरपंच / उपसरपंच यांच्या मानधनात लोकसंख्येच्या प्रमाणात जास्तीत जास्त रुपये १०,००० /- इतक्या रक्कमेची वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुक्ताईनगर (जि.जळगाव) येथील शासकीय कृषी महाविद्यालय येथे पाणीपुरवठा योजनेस मंजुरी मिळणेबाबत

**(१८) २३७४३ (२०-०७-२०२४) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुक्ताईनगर (जि.जळगाव) येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी अंतर्गत सन २०१६ मध्ये शासकीय कृषी महाविद्यालय सुरु करण्यात आले असून येथील पाणीपुरवठा योजनेस मंजुरी मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.कृषीमंत्री यांचेकडे दिनांक २७ ऑगस्ट, २०२३ रोजी लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने सदर पाणीपुरवठा योजनेस मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे (०८-१२-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२) शासकीय कृषी महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे पाणीपुरवठा योजना मंजूर करण्याकरीताच्या सविस्तर प्रकल्प अहवालास व अंदाजपत्रकास मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे. तसेच, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेने मान्यता प्रदान केली आहे. त्यानुषंगाने शासकीय कृषी महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे पाणीपुरवठा योजनेस प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावर विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मिरकरवाडा (जि.रत्नागिरी) बंदरावर डिझेल विक्री बंद ठेवल्याबाबत

**(१९) २४१०५ (१८-०७-२०२४) श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेट्रोल पंपावरून येणाऱ्या टँकरद्वारे मिरकरवाडा (जि.रत्नागिरी) बंदरावर मच्छीमार सहकारी संस्थांच्या नौका तपासणी केल्यानंतर जोपर्यंत प्रमाणीत होत नाहीत तोपर्यंत सहकारी संस्थांकडून डिझेल वितरित करण्यात येणार नाही असे सहाय्यक, मत्स्यव्यवसाय विभाग यांनी निदेश दिले असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सहकारी संस्थेमार्फत वितरित करण्यात येणारे डिझेल विक्री सहाय्यक, मत्स्यव्यवसाय विभागामार्फत बंद ठेवण्यात आल्याने डिझेलअभावी मच्छीमार करणाऱ्या नौकांचे तसेच सहकारी संस्थेचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राजिवाडा महिला सहकारी संस्थेने आंदोलन करुन सहकारी संस्थेमार्फत सवलतीच्या दरात डिझेल उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने सवलतीच्या दरात डिझेल उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नितेश राणे (१०-१२-२०२५) :** (१) अंशतः खरे आहे.

(२) व (३) हे, अंशत: खरे आहे. रत्नागिरी तालुक्यातील काही पेट्रोल पंप धारकांनी डोर-टू-डोर डिझेल वितरण करण्याची परवानगी घेतलेली आहे. डिझेल कोटा मंजुरीसाठी मुख्य कार्यालयास प्रस्तावित करण्यापूर्वी अवैध मासेमारी सामुग्री व उपसाधने न वापरता मासेमारी करीत असल्याबाबतची आपल्या कार्यक्षेत्रातील नौकांची पडताळणी करून खातरजमा करणे आवश्यक आहे. त्यानुसार संबंधित कार्यक्षेत्रातील परवाना अधिकारी यांनी कार्यक्षेत्रनिहाय तपासणी करून ११३६ नौकांची प्रमाणपत्रे सादर केल्यानुसार आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयामार्फत माहे ऑगस्ट २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीसाठी २७ मच्छीमार सहकारी संस्थांच्या ११३६ नौकांना डिझेल कोटा मंजूर करण्यात आला आहे.
(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

## दहेगांव (ता.कळमेश्वर, जि.नागपूर) ग्रामपंचायतीच्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(२०) २४३८६ (१४-०८-२०२४) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहेगांव (ता.कळमेश्वर, जि.नागपूर) ग्रामपंचायतीअंतर्गत असलेले पादाळे येथील ले-आऊटचे फेरफार घेण्याबाबत १० भूखंडधारकांनी केलेले अर्ज संबंधित ग्रामसेवक यांनी सदरील अर्ज दहेगांव ग्रामपंचायतीच्या मासिक सभेत दिनांक २९ एप्रिल, २०२४ मध्ये मांडून ते विनाअट मंजूर करण्यात आले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ले-आऊटचा फेरफार घेण्याबाबत इतर उर्वरित भूखंडधारकांनी ग्रामपंचायतीकडे अर्ज केले असता दिनांक १३ मे, २०२४ रोजीच्या विशेष ग्रामसभेत मात्र या ले-आउटमध्ये आबादीची जागा व विकासकामे झाली नसल्याचे कारण देत सदर फेरफार अर्ज फेटाळून लावण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू ग्रामसभा ठरावानंतर पुनश्च झालेल्या मासिक सभेत १० भूखंडधारकांचे फेरफार घेण्याबाबतचा दिनांक २९ एप्रिल, २०२४ रोजीच्या मासिक सभेत पारित करण्यात आलेला ठराव रद्द करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त सर्व ठराव लोकसभा निवडणुकीची आचारसंहितेच्या कालावधीत बेकायदेशीररित्या पारित करण्यात येऊनही ग्रामपंचायत सचिवाने कोणतीही हरकत घेतलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी बेकायदेशीर ठराव पारित करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (२०-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

वरील नमूद १० भूखंड धारका व्यतिरिक्त इतर कुणीही मधल्या कालावधीत अर्ज सादर केलेले नाही. तसेच सदर सभेत पादाडे ले आऊट मधील काही जागा आबादी जागेत अतिक्रमण असल्याची तक्रार असून सर्वप्रथम ले आऊट ची शासकीय मोजणी करून व इतर सोई सुविधा पुरवल्या नंतरच फेरफार घेणेबाबत ग्रामसभेत ठरले.

(३) होय, हे खरे आहे.

(४) ग्रामसभाग घेतेवेळी सचिव यांनी सरपंच यांना लोकसभा सार्वत्रिक निवडणुकांची आदर्श आचारसंहिता लागू असल्यामुळे धोरणात्मक निर्णय घेता येणार नाही असे टिप्पणीच्या नस्तीवरून निदर्शनास आणून दिल्याचे दिसून येते, परंतु सरपंचांनी ग्रामसभा घेण्यास सांगितल्यामुळे सभा घेण्यात आली आहे असे निदर्शनांस आलेले आहे परंतु ग्रामसभा व त्यापूर्वीची मासिक सभा निवडणूक आचारसंहिता कालावधीत घेण्यात आलेला ठराव व पारित करण्यात आलेला ठरावावर सचिवाने आपले मत नोंदविलेले नाही.परंतु ग्रामसभा घेणे बाबतच्या टिप्पणीमध्ये मत नोंदविलेले आहे. आचारसंहिता कालावधीत घेण्यात आलेल्या ठरावावर कोणत्याही प्रकारची अंमलबजावणी झाल्याची दिसून आलेले नाही.

(५) सदर बाब गट विकास अधिकारी,पंचायत समिती कार्यालयाचे निदर्शनांस आल्यानंतर सचिव, ग्रामपंचायत दहेगाव यांना गट विकास अधिकारी, कमळेश्वर यांनी दिनांक ०७/०८/२०२५ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावुन खुलासा मागविण्यात आला होता,त्यानुसार सचिवाने दिनांक १२/०९/२०२५ रोजी सादर केलेल्या खुलासाचे अवलोकन केले असता प्राप्त खुलासा असमाधानकारक दिसून आल्याने सचिव श्रीमती.प्रियंका तागडे यांच्याकडून प्रशासकीय अनियमितता झाल्याचे दिसून आल्याने गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कमळेश्वर यांच्याकडील दिनांक २३/०९/२०२५ चे आदेशान्वये श्रीमती. प्रियंका तागडे, ग्रामपंचायत अधिकारी,ग्रामपंचायत दहेगाव यांना शिक्षा करून एक वर्षासाठी एक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरूपात थांबविणेची शिक्षा अंतिम करण्यात आलेली आहे.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.